**MHNS160007522024**

## चांदवड सह दिवाणी न्यायदंडाधिकारी, ता. चांदवड, जि.नाशिक

(पिठासीन अधिकारी – श्रीमती वृषाली दी. सुंगारे)

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र.३५/२०२४**

### – आदेश नि.क्र. ०३ खाली –

(दिनांक १६.०७.२०२५ रोजी घोषित)

१. अर्जदार क्र. १ ने स्वतःसाठी व अर्जदार क्र. २ व ३ साठी सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र.१ ते ७ यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनीयम, २००५ च्या कलम १२, १८, १९, २०, २२, २३ अन्वये दाखल केलेला आहे. अर्जदाराने सदर कायद्याच्या कलम २३ अंतर्गत अंतरीम अन्न वस्त्र मिळण्याची मागणी या अर्जाद्वारे केलेली आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे कि–

अर्जदार क्र. १ व सा.वाला. क्र. १ यांचा विवाह हिंदू धर्मशास्त्र पद्धतीप्रमाणे व त्यांच्या समाजातील चालीरीतीनुसार दि.११.०५.२०१५ रोजी झाला व सदर विवाहबंधनातून अर्जदार क्र. १ व सा.वाला क्र. १ यांना अर्जदार क्र. २ व ३ या दोन मुली झालेल्या आहेत. अर्जदाराने तिच्या अर्जात कथन केले आहे की सा.वाल्यांच्या मागणीनुसार तिच्या आई वडीलांनी तिचा व सा.वाला क्र. १ चा साखरपुडा एप्रिल २०१५ मध्ये चांगल्या पद्धतीने करुन दिला व अर्जदार क्र. १ च्या

आई वडीलांनी सा. वाला क्र. १ ला दोन तोळ्याची सोन्याची चैन व एक तोळ्याची सोन्याची अंगठी तसेच कपडेलत्ते दिले व साधारणतः दिड लाख रुपये अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी साखरपुड्याकरीता खर्च केले. त्यानंतर सा.वाल्यांनी लग्र्नामध्ये अर्जदार क्र. १ च्या वडीलांकडून पाच तोळे सोने व घरातील संसारउपयोगी वस्तुंची मागणी केली. त्यांच्या मागण्या मान्य करुन अर्जदार क्र. १ च्या वडिलांनी तिचा व सा.वाले क्र. १ यांचा विवाह दि.११.०५.२०१५ रोजी भयाळे ता. चांदवड येथे थाटामाटात करुन दिला. या लग्नामध्ये अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी सा.वाल्यांच्या मागणीप्रमाणे सर्व संसारउपयोगी वस्तु दिल्या, भांडी दिली तसेच अर्जदाराच्या अंगावर तीन तोळ्याचे सोन्याचे नेकलेस, दोन तोळ्याचे मंगळसुत्र, एक तोळ्याचे कानातील टॉप्स, चांदीचे पैंजण व जोडगे दिले.

३. लग्नानंतर अर्जदार क्र. १ सा.वाले क्र. १ कडे त्यांच्या एकत्र कुटूंबात कुंभारी ता. निफाड येथे नांदायला गेली. मात्र सुरुवातीच्या चार ते पाच महिन्यानंतर अर्जदाराच्या आई वडिलांनी चांगले लग्न करुन दिले नाही, मानपान केला नाही, हुंडा दिला नाही असे म्हणून सा.वाले नेहमी अर्जदार क्र. १ च्या आई वडिलांबद्दल अपशब्द वापरत होते व अर्जदार क्र. १ चा नेहमी क्षुल्लक कारणावरुन अपमान करत होते, रात्री बेरात्री मारहाण करत होते, उपाशी ठेवत होते, काबाड कष्टाची कामे करण्यास भाग पाडत होते. अर्जदार क्र. १ वर सा.वाले नेहमी चारित्र्याचा संशय घेऊन अश्लील शिवीगाळ करत होते व अपमानित करत होते. अर्जदार सा.वाले क्र. १ च्या घरी नांदत असतांना तिचे सासरे म्हणजे सा.वाले. क्र. २ हे नेहमी अर्जदार क्र. १ कडे वाईट नजरेने बघत होता त्याबाबत अर्जदार क्र. १ ने सा.वाले क्र. १ ला अनेकदा सांगुन देखील त्यांनी त्याबाबत काहीही न करता उलट अर्जदार क्र. १ लाच जिवे मारण्याची धमकी देत होते.

४. अर्जदार क्र. १ च्या आई वडिलांनी लग्नाच्यावेळी तिला दिलेला नेकलेस सा. वाला क्र. ४ च्या शिक्षणाकरीता अर्जदार क्र. १ च्या संमतीशिवाय सा.वाल्यांनी परस्पर विकून टाकला. सा.वाला क्र. १ ते ४ हे वेगवेगळ्या कारणांवरुन अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व मारहाण करत होते. सा.वाले क्र. ५ ते ७ नेहमी अर्जदाराच्या संसारात ढवळाढवळ करत होते.

५. अर्जदार क्र. १ हा सर्व त्रास सहन करत सा.वाला क्र. १ कडे नांदत असतांना दरम्यानच्या काळात सा.वाला क्र. १ पासून गरोदर राहिली मात्र सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ ची तिच्या गरोदरपणात देखील कोणतीही काळजी घेतली नाही व तिच्यावर कोणतेही औषधोपचार केले नाही. दि.१७.०३.२०१६ रोजी सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ कडे शेततळ्यासाठी दोन लाख रुपयांची मागणी केली व त्याला अर्जदार क्र. १ ने विरोध केल्यावर सा.वाल्याने तिला बेदम मारहाण, शिवीगाळ व दमदाटी करुन घराबाहेर हूसकावून दिले. त्यामुळे अर्जदार क्र. १ ने सा.वाल्यांविरुद्ध पिंपळगाव बसवंत पोलीस स्टेशनला तक्रार देखील केली होती.

६. दि.०४.०९.२०१६ रोजी अर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. २ ला जन्म दिला. त्याबाबत सा. वाल्यांना कळविल्यावर आम्हाला मुलगा हवा होता ही मुलगी आमची नाही असे म्हणून सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ च्या बाळंतपणाचा कोणताही खर्च केला नाही. अर्जदार क्र. २ च्या जन्मानंतर सात महिने होऊन देखील सा.वाले अर्जदार क्र. १ ला नांदवायला नेले नाही तेव्हा तिच्या कुटूंबियांनी सा.वाला क्र. १ ला समजावून अर्जदार क्र. १ ला अर्जदार क्र. २ सह सा.वाल्यांच्या घरी नांदायला पाठविले. मात्र दहा ते पंधरा दिवसातच सा.वाले क्र. ४ च्या लग्नासाठी अर्जदार क्र. १ कडे तीन लाख रुपयांची मागणी केली व त्यावरुन सा.वाला क्र. १, २ व ४ नेहमी अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व मारहाण करत होते.

७. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र. १ ही सा.वाले क्र. १ पासून दुसऱ्यांदा गर्भवती राहिली. मात्र तेव्हा देखील सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ ची कोणतीही काळजी घेतली नाही. दि.३०.०१.२०२० रोजी अर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. ३ ला जन्म दिला. मात्र दुसऱ्यांदा देखील मुलगीच झाली याकारणावरुन सा.वाले अर्जदार क्र. १ शी भांडण काढत होते, वाद करत होते व सा.वाला क्र. १ अर्जदार क्र. १ ला मुलगा झाला नाही याकारणावरुन नेहमी मारहाण व शिवीगाळ करत होता.

८. अर्जदार क्र. १ सा.वाल्यांचा सर्व त्रास निमुटपणे सहन करुन त्यांच्यासोबत राहत होती मात्र सा.वाल्यांनी वेळोवेळी अर्जदाराला शिवीगाळ व बेदम मारहाण केली. त्याबाबत तिने पिंपळगाव पो.स्टेशनला सा.वाल्यांविरुद्ध दोन वेळा तक्रार देखील दिली आहे. तसेच सा.वाल्यांच्या स्वभावात व त्यांच्या अर्जदार क्र. १ ला शारीरिक व मानसिक त्रास देण्याच्या वृत्तीत कोणताही फरक पडत नसल्यामुळे अर्जदार क्र. १ ने त्यांच्याविरुद्ध दि.१४.०१.२०२३ रोजी महिला सुरक्षा विभाग नाशिक यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केला. तेथे सा.वाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला व्यवस्थित नांदवायची हमी दिल्यामुळे अर्जदार क्र. १ पुन्हा सा.वाला क्र. १ कडे नांदायला गेली. मात्र त्यांच्या स्वभावात काहीही फरक पडला नाही व सा. वाला पुर्वीप्रमाणेच अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व बेदम मारहाण करत असे.

९. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की सा.वाला क्र. २ अर्जदार क्र. १ कडे नेहमी वाईट नजरेने बघत असे. तसेच तिच्याशी अंगलट करण्याचा प्रयत्न करत होता. सा.वाला क्र. २ ने अर्जदार क्र. १ वर जबरदस्ती करण्याचा देखील प्रयत्न केला होता. त्याच्या या वर्तणूकीबाबत अर्जदार क्र. १ ने सा.वाला क्र. १ ला सांगितले असताही त्याने अर्जदार क्र. १ चे काहीही ऐकून घेतले नाही व उलट अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बेदम मारहाण व शिवीगाळ केली. सा.वाल्याने दि.०७.०४.२०२४

रोजी अर्जदार क्र. १ वर विनाकारण संशय घेऊन तिला बेदम मारहाण केली व माहेरहून तीन लाख रुपये आणण्याची मागणी केली व सा.वाले क्र. ३ चे ऐकून सा.वाले क्र. ४ ते ७ यांनी अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व मारहाण करुन घराबाहेर काढले. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिच्या दोन्ही लहान मुलींसह नाईलाजाने तिच्या माहेरी राहत आहे.

१०. अर्जदार क्र. १ ने पुढे कथन केले आहे की, तिचे स्वतःचे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तिच्यावर तिच्या दोन्ही लहान मुलींची जबाबदारी आहे. सा.वाला क्र. १ यांची कुंभारी पिंपळगाव बसवंत ता. निफाड येथे सात ते आठ एकर बागायत शेती असून त्यामध्ये सा.वाला द्राक्ष, कांदे, मका, सोयाबीन अशी पिके घेतो व वर्षाकाठी पंधरा ते विस लाख रुपयांचे उत्पन्न मिळवतो. सा.वाला क्र. १ वर अर्जदार क्र. १ ते ३ शिवाय इतर कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या उदरनिर्वाहाकरीता सा.वाला क्र. १ कडून दरमहा प्रत्येकी दहा हजार रुपये अंतरिम अन्न वस्त्र म्हणून मिळण्याची विनंती अर्जदार क्र. १ ने सदर अर्जाद्वारे केलेली आहे.

११. सा.वाला क्र. १ ने त्यांचा लेखी जबाब निशाणी १४ कडे दाखल केलेला असून त्यामध्ये त्यांनी अर्जदार क्र. १ ने त्यांच्याविरुद्ध केलेली सर्व विधाने स्पष्ट शब्दात फेटाळलेली आहेत. सा.वाला. क्र १ ने अर्जदार क्र. १ त्याची विवाहाची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ या त्याच्या सदर विवाहबंधनातून झालेल्या मुली असल्याचे मान्य केले आहे. त्याने पुढे कथन केले आहे की, लग्नानंतर त्याने कधीही अर्जदार क्र. १ चा कोणत्याही कारणाने शारीरिक व मानसिक छळ केला नाही. तसेच कधीही कोणतीही शिवीगाळ व मारहाण केली नाही.

१२. सा.वाला क्र. १ ने कथन केले आहे की, त्यांच्या लग्नाचा खर्च ज्याने त्याने निम्मा-निम्मा केलेला आहे. सा.वाला क्र. १ हा सा.वाला क्र. २ व ३ यांचा

एकुलता एक मुलगा असून सा.वाले क्र. ४ ते ७ या त्यांच्या मुली आहेत व त्यांचे लग्न झालेले असून त्या त्यांच्या सासरी नांदत आहेत. अर्जदार क्र. १ लग्नानंतर सा.वाल्यांच्या कडे केवळ तीन ते चार महिने व्यवस्थित राहिली त्यानंतर ती सा.वाले क्र. १ ते ३ यांच्याशी क्षुल्लक कारणांवरुन भांडण करु लागली. अर्जदार क्र. १ चा स्वभाव हेकेखोर असल्यामुळे ती नेहमी सा.वाला क्र. १ ते ३ यांचा अपमान करत असे. अर्जदार क्र. १ ही घरातील कोणतेही काम करत नव्हती व सा.वाले क्र. ४ ते ७ या कधी सणानिमित्त जरी माहेरी आल्या तरी त्यांना अर्जदार क्र. १ नेहमी अपमानित करत असे. अर्जदार क्र. १ नेहमी क्षुल्लक कारणांवरुन सा.वाल्यांशी भांडण करत असे. सा.वाल्याने पुढे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही दि.०७.०४.२०२४ रोजी स्वतःच्या मर्जीने मुलींसह व स्वतःचे दागिने घेऊन माहेरी निघून गेली आहे. अर्जदार क्र. १ जेव्हा पहिल्यांदा सा.वाला क्र. १ पासून गर्भवती राहिली तेव्हा तिने सा.वाला क्र. १ ला त्याबाबतची काहीही माहिती न देता परस्पर गर्भपात करुन घेतला. त्यानंतर जेव्हा पुन्हा अर्जदार क्र. १ गर्भवती राहिली तेव्हा तिचा संपूर्ण दवाखान्याचा खर्च सा.वाला क्र. १ नेच केलेला आहे. अर्जदार क्र. २ च्या जन्मानंतर जवळपास एक वर्षाने अर्जदार क्र. १ हिला सा.वाले व त्यांच्या नातेवाईकांनी अनेकदा समजावून सांगितल्यानंतर सा.वाला क्र. १ च्या घरी नांदायला आली. त्यावेळी सा.वाले क्र. ४ ते ७ यांनी माहेरी यायचे नाही अशी अट अर्जदार क्र. १ ने घातली जी सा.वाले क्र. ४ ते ७ यांनी मान्य देखील केली. मात्र तरी देखील अर्जदार क्र. १ च्या स्वभावात कोणताही फरक पडला नाही. ती नेहमी सा.वाले क्र. १ ते ३ यांचा वेळोवेळी विनाकारण अपमान करत असे. तसेच त्यांना वाईट शिवीगाळ देखील करत होती. अर्जदार क्र. १ नेहमी त्रयस्थ इसमांशी तासनतास फोनवर बोलत असे व त्याबाबत सा.वाला क्र. १ ने विचारल्यावर त्याला उडवाउडवीची उत्तरे देत असे. अर्जदार क्र. ३ च्या जन्मावेळी देखील सर्व खर्च सा.वाला क्र. १ ते ३ यांनीच

केलेला आहे. अर्जदार क्र. १ नेहमी सा.वाला क्र. १ ला अपमानित करत असे व घटस्फोटाची मागणी करत असे. अर्जदार क्र. १ ला सा.वाला क्र. १ सोबत संसार करण्यात कोणतेही स्वारस्य सुरुवातीपासूनच नव्हते.

१३. पुढे त्यांनी कथन केले आहे की, सा.वाला क्र. २ यांना अर्धांगवायू झालेला असून त्यांच्या औषधोपचारासाठी सा.वाला क्र. १ ला बराच मोठा खर्च करावा लागतो. जमिनीचा ताबा देखील त्यांच्याकडे नाही. त्यामुळे सा. वाला क्र. १ मिळेल ते काम करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवत आहे. सा.वाला क्र. १ ची अर्जदारांना नुकसान भरपाई, अन्न वस्त्र किंवा आर्थिक सहाय्य देण्याची ऐपत नाही. याउलट अर्जदार क्र. १ ही उच्च शिक्षित असून धडधाकट आहे तिच्या वडीलांना ती शेतीमध्ये मदत करते व त्यापासून चांगले उत्पन्न देखील मिळवते. पुढे त्यांनी कथन केले आहे की, त्यांनी कधीही अर्जदार क्र. १ चा कोणताही शारीरिक व मानसिक छळ केला नाही. केवळ पुरावा तयार करण्यासाठी जाणीवपूर्वक अर्जदार क्र. १ ने सा.वाल्यांविरुद्ध पोलीस स्टेशन तसेच महिला सुरक्षा विभागाकडे सा.वाल्यांविरुद्ध खोट्या तक्रारी दिल्या आहेत. सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ चा कधीही, कोणताही शारीरिक व मानसिक छळ केला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नसून सा.वाला क्र. १ च्या हलाखीच्या परिस्थितीमुळे तो अर्जदार क्र. १ ते ३ यांना स्वतंत्र अन्न वस्त्राची रक्कम देऊ शकत नसल्याचे सा.वाला क्र. १ ने कथन केले आहे.

१४. सा.वाला क्र. १ च्या आई वडिलांनी त्याला शेतमिळकतीतून बेदखल केले आहे. त्याच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे सदरचा अंतरिम अर्थसहाय्य मिळण्यासाठीचा अर्जदार क्र. १ चा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती सा.वाल्यांनी केली आहे.

१५. माननीय सर्वोच्च न्यायालय यांच्या रजनेश वि. नेहा या न्यायनिर्णयात

दिलेल्या निर्देशानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांचे देयक व मालमत्ताचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार अर्जदाराने तिचे देयक व मालमत्तेचे प्रतिज्ञापत्र **निशाणी क्र. १** कडे दाखल केले. सा.वाल्यांनी त्यांचे देयक व मालमत्तेचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदाराचा अर्ज त्यावरील सा.वाल्याचे म्हणणे दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकून पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात, त्यांची कारणमीमांसा पुढे देत आहे.

निष्कर्ष

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ चा कौटूंबिक हिंसाचार केल्याचे अ.क्र. १ सिद्ध करते काय ? | **प्राथमिक दृष्ट्या होय** |
| २ | अ.क्र.१ ते ३ सा.वाला क्र. १ कडून अंतरिम अन्न वस्त्राची रक्कम मिळण्यास पात्र आहेत का ? किती ? | **अंशता होकारार्थी** |
| ३ | अंतिम आदेश काय ? | **अर्जदाराचा अर्ज अंशता मंजूर करण्यात येतो.** |

१६. अर्जदाराने तिच्या अर्जात कथन केले आहे की, लग्नानंतर सा.वाल्यांनी वारंवार तिचा पैशासाठी शारिरीक व मानसिक छळ केला. सा.वाला क्र. १ नेहमी तिला शिवीगाळ व मारहाण करत होता व त्याला इतर सा.वाले नेहमी चिथावणी देत होते. अर्जदाराने तिच्या अर्जात कथन केले आहे की, सा.वाले नेहमी तिच्याकडे पैशाची मागणी करत असत व त्यासाठी तिला शिवीगाळ व बेदम माहरण करत होते. तसेच

दि.०७.०४.२०२४ रोजी सा.वाल्यांनी तिच्यावर संशय घेऊन अर्जदार क्र. १ ला बेदम मारहाण करुन घरातून हाकलून दिले. अर्जदार क्र. १ च्या कथनानुसार तेव्हापासून सा.वाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही तजवीज केलेली नाही.

१७. प्रस्तुतकामी सा.वाले यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी त्यांच्यावर अर्जदार क्र. १ ने केलेले सर्व आरोप फेटाळून लावलेले आहेत. सा.वाल्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कथन केले आहे की, त्यांनी लग्नानंतर अर्जदार क्र. १ चा कधीही, कोणताही शारीरिक व मानसिक छळ केलेला नाही. उलट अर्जदार क्र. १ लाच सा.वाला क्र. १ सोबत नांदायची इच्छा नसल्यामुळे ती स्वतः तिच्या मर्जीने तिचे दागिने व दोन्ही मुलींना घेऊन माहेरी निघून गेली आहे. मात्र सा.वाल्यांच्या या विधानाची सत्यता दोन्ही बाजूंचा पुरावा बघून अंतिम निर्णयावेळी ठरवता येईल.

१८. अर्जदार क्र. १ ने प्रस्तुतचे प्रकरण तिच्या शपथपत्रासोबत दाखल केलेले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या अनेक न्यायनिर्णयानुसार त्यावर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण मला वाटत नाही. त्यामुळे ज्या अर्थी अर्जदार क्र. १ तिच्या पतीविरुध्द व सासरच्या लोकांविरुध्द त्यांनी केलेल्या शारिरीक व मानसिक छळाबाबत दाद मागण्यासाठी न्यायालयात आलेली आहे, त्याचाच अर्थ तिने अर्जात कथन केल्याप्रमाणे सा.वाल्यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. कोणतीही भारतीय विवाहित स्त्री तिच्या वैवाहिक आयुष्यामध्ये सर्व काही व्यवस्थित चालले असताना केवळ कोणत्याही क्षुल्लक कारणावरुन तिच्या पतीविरुध्द व सासरच्या लोकांविरुध्द दाद मागण्यासाठी न्यायालयात येणार नाही. त्यामुळे ज्या अर्थी अर्जदार क्र. १ ने तिच्या पती व सासरच्या लोकांविरुद्ध न्यायालयात दाद मागितली आहे. त्याअर्थी सा.वाल्यांनी लग्नानंतर तिचा कौटूंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी

दिसून येते.

१९. दिनांक ०७.०४.२०२४ रोजी सा.वाला क्र. १ ने इतर सा.वाल्यांच्या चिथावणीवरुन अर्जदार क्र. १ ला अर्जदार क्र. २ व ३ सह घरातून हाकलून दिले व नांदविण्यास स्पष्ट नकार दिला. तेव्हापासून म्हणजेच जेव्हापासून अ. क्र. १ सा. क्र. १ पासून विभक्त राहत आहे तेव्हापासून अर्जदार तिच्या माहेरीच राहत आहे.

२०. दिनांक ०७.०४.२०२४ पासून सा.वाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी तसेच तिच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही आर्थिक मदत केलेली दिसून येत नाही. सा.वाला क्र. १ ने जरी त्याच्या म्हणण्यामध्ये त्यांनी अर्जदार क्र. १ चा शारीरिक व मानसिक छळ केल्याचे नाकारले असले तरी त्यांच्या म्हणण्याची सत्यता सदर प्रकरणाच्या अंतिम निकालावेळी दोन्ही बाजूचा पुरावा बघून ठरवता येईल. अर्जदार क्र. १ वर अर्जदार क्र. २ व ३ या दोन लहान मुलींची देखील जबाबदारी आहे. असे असतांना केवळ स्वतःच्या पतीला व सासरच्या लोकांना विनाकारण त्रास देण्यासाठी कोणतीही विवाहित भारतीय स्त्री स्वतःच्या पतीविरुद्ध दाद मागण्यासाठी न्यायालयात जाणार नाही. न्यायालयात प्रकरण दाखल केल्यामुळे त्याचा त्यांच्या वैवाहिक जिवनावर देखील परिणाम होईल याची पूर्ण कल्पना असतांना देखील अर्जदार क्र. १ ने ज्या अर्थी सा.वाल्यांविरुद्ध दाद मागण्यासाठी सदरचे प्रकरण न्यायालयात दाखल केले आहे त्या अर्थी प्राथमिक दृष्ट्या सा.वाल्यांनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दिसून येते.

२१. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जात स्पष्टपणे कथन केले आहे की दि.०७.०४.२०२४ पासून ती तिच्या माहेरी तिच्या दोन्ही मुलींसह आश्रीताचे जिवन जगत आहे. सा.वाल्याने देखील एप्रिल २०२४ पासून त्याने अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या उदरनिर्वाहासाठी, त्यांच्या दैनंदिन गरजांच्या पुर्ततेसाठी अर्जदार क्र. १ ला आर्थिक

मदत केल्याचे कथन केले नाही. अर्जाचे अवलोकन करता अर्जदार क्र. १ चे स्वतःचे कोणतेही उत्पन्न नसल्याचे दिसून येते. तिच्यावर दोन लहान मुलींची देखील जबाबदारी आहे.

२२. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये केलेल्या कथनानुसार सकृतदर्शनी असे दिसून येते की लग्नानंतर सा.वाल्यांनी पैशासाठी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला व जेव्हा पासून अर्जदार क्र. १ अर्जदार क्र. २ व ३ सह तिच्या माहेरी एप्रिल २०२४ पासून सा.वाला क्र. १ पासून विभक्त तिच्या माहेरी राहू लागली तेव्हा पासून ते आजतागायत देखील सा.वाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या पालनपोषणासाठी व त्यांच्या दैनंदिन गरजांच्या पुर्ततेसाठी कोणतीही तजवीज केलेली नाही. स्वतः सा.वाला क्र. १ ने देखील एप्रिल २०२४ पासून त्याने अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या पालनपोषणासाठी आर्थिक मदत केल्याचे त्याच्या उत्तरामध्ये कथन केले नाही. हे देखील सदर कायद्याच्या आर्थिक हिंसाचाराच्या संज्ञेमध्ये मोडते. सदर कायद्यानुसार कौटूंबिक हिंसाचाराची व्याख्या केलेली असून ती खूप मोठी आहे. त्यामध्ये शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक या सर्व हिंसाचारांचा अंतर्भाव केलेला आहे. सा.वाला क्र. १ ने दि.०७.०४.२०२४ पासून अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या पालन पोषणासाठी कोणतीही तजवीज केली नाही हे सकृतदर्शनी दिसून येते. जे कौटूंबिक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडते. त्यामुळे या सर्व बाबी पाहता सा.वाला क्र. १ ने व इतर सा.वाल्यांनी अर्जदार क्र. १ चा लग्नानंतर कौटूंबिक हिंसाचार केलेला आहे असे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. २ व ३**

२३. सा.वाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ चा कौटूंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी निष्कर्ष नोंदविल्यानंतर अर्जदार क्र. १ सा.वाला क्र. १ कडून अंतरिम

अन्न–वस्त्र मिळण्यास पात्र आहे ? व असल्यास किती हे ठरवणे गरजेचे आहे.

२४. सा.वाला क्र. १ ने त्याचे अर्जदार क्र. १ सोबत पती म्हणून व अर्जदार क्र. २ व ३ सोबत पिता म्हणून असलेले नातेसंबंध कोठेही नाकारलेले नाही. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जात स्पष्टपणे कथन केले आहे की तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व तिच्यावर अर्जदार क्र. २ व ३ या दोघींची देखील जबाबदारी आहे. सा.वाला क्र. १ ने जरी त्याच्या उत्तरामध्ये त्याने अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे नाकारलेले असले तरी मुद्दा क्र. १ मध्ये विस्तृत विवेचन केल्याप्रमाणे सा.वाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ चा लग्नानंतर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे व दि.०७.०४.२०२४ रोजी माहेरहून पैसे आणण्यासाठी तिला शिवीगाळ व मारहाण करुन दोन्ही अर्जदारांसह घराबाहेर हाकलून दिल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

२५. सा.वाला क्र. १ चे उत्पन्न दाखविण्यासाठी अर्जदार क्र. १ ने अभिपटलावर काही ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. मात्र सा.वाला क्र. १ ने त्याच्या उत्तरामध्ये कथन केले आहे की, त्या शेतजमिनी त्याच्या एकट्याच्या मालकीच्या नसून त्यामध्ये अजून वाटणी झालेली नाही. त्या सर्व शेती जिरायत असून त्यापासून त्यांना विशेष असे कोणतेही उत्पन्न मिळत नाही. सा.वाला क्र. १ ला त्याच्या आई वडिलांनी त्या शेतीमधून त्याला बेदखल केले आहे. त्याच्यावर सा.वाला क्र. २ व ३ ची देखील जबाबदारी आहे. सा.वाला क्र. १ चे असे कोणते निश्चित उत्पन्नाचे साधन नसून जे मिळेल ते काम करुन तो आपली उपजिवीका चालवतो. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांना अंतरिम पोटगी देण्याची त्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी त्याने केलेली आहे.

२६. सा.वाला क्र. १ अर्जदार क्र. १ चा पती व अर्जदार क्र. २ व ३ चा पिता असल्याचे त्याने स्पष्ट शब्दात मान्य केले असल्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ प्रती

असणारी नैतिक व कायदेशीर जबाबदारी सा.वाला क्र. १ कोणत्याही कारणाने नाकारु शकत नाही. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जात कथन केले आहे की सा.वाला क्र. १ ची कुंभारी पिंपळगाव बसवंत ता. निफाड येथे ७ ते ८ एकर बागायत शेती असून त्यामध्ये सा.वाला क्र. १ द्राक्ष, कांदे, मका, टोमॅटो, सोयाबीन अशी नगदी पिके घेतो व दरवर्षी साधारणतः १५ ते २० लाखांचे निव्वळ उत्पन्न मिळते. सा.वाल्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे व सा.वाल्यावर अर्जदार क्र. १ ते ३ शिवाय कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी १०,०००/– रुपये सा.वाला क्र. १ कडून अंतरिम अन्न वस्त्र म्हणून मिळण्याची विनंती अर्जदार क्र. १ ने तिच्यासाठी अर्जदार क्र. २ व ३ साठी केली आहे.

२७. सा.वाला क्र. १ ने त्याच्या लेखी उत्तरामध्ये हे स्पष्ट शब्दात नाकारले आहे की त्याची चांगल्या प्रकारची शेती असून अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे तो दरवर्षी शेतामधून १५ ते २० लाखांचे उत्पन्न मिळवतो. सा.वाला क्र. १ ने त्याच्या उत्तरामध्ये कथन केले आहे की सा.वाला क्र. २ व ३ म्हणजेच त्याचे आई वडील वयोवृद्ध असून ते सतत आजारी असतात त्यांच्या औषधोपचारासाठी सा.वाला क्र. १ ला मोठा खर्च करावा लागतो. सा.वाला क्र. १ मिळेल ते काम करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो. सा.वाला क्र. १ ने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र निशाणी १६ कडे दाखल केले आहे. मात्र त्यामध्ये त्याने त्याच्या उत्पन्नाबाबत काहीही नमुद केले नाही. सा.वाला क्र. १ चे उत्पन्न दाखविण्यासाठी अर्जदार क्र. १ ने प्रस्तुतकामी मौजा पालखेड ता. निफाड येथील गट नं. ३०७, मौजा कुंभारी येथील गट नं. १२६, गट नं. १२७, गट नं. १४३, गट नं. १४४/२, गट नं. १५८, गट नं. १९०, गट नं. २६१, गट नं. ४५२ यांच्या ७/१२ उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांचे अवलोकन करता त्यामध्ये इतर सहहिस्सेदारांची देखील नावे

असल्याचे दिसून येते. मात्र  या जमिनींमध्ये विहीर व बोरवेल असल्याचे तसेच द्राक्ष, भूईमूग, सोयाबीन, टोमॅटो, कांदा अशी पिके घेत असल्याचे दाखल ७/१२ उताऱ्यांवरुन दिसून येते. तसेच हे सर्व ७/१२ उतारे नविन असल्याचे देखील दिसून येते. सदरच्या सर्व शेतजमिनी सा.वाला क्र. २ म्हणजेच अर्जदार क्र. १ चे सासरे व सा.वाला क्र. १ च्या वडीलांच्या नावे असल्याचे दिसून येते. जरी या शेत जमिनींमध्ये इतर सहहिस्सेदार असल्याचे या ७/१२ उताऱ्यांवरुन दिसत असले तरी त्या जमिन मिळकतींमधून वरील प्रमाणे पिके घेत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे त्यापासून सा.वाला क्र. २ म्हणजेच सा.वाला क्र. १ चे वडील चांगले उत्पन्न घेत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सा.वाला क्र. १ हा सा.वाला क्र. २ चा मुलगा आहे. त्यामुळे या शेतजमिनींमध्ये त्याचाही कायदेशीर हिस्सा असल्याचे व या जमिनींमधून तो चांगले उत्पन्न घेत असल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून येते. त्यामुळे सा.वाला क्र. १ कडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असून देखील तो अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या पालन पोषणासाठी काहीही तजवीज करत नसल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून येते. सा.वाला क्र. १ ने त्याच्या उत्तरामध्ये कथन केले आहे की अर्जदार क्र. १ ही धडधाकट व उच्चशिक्षित असून ती तिच्या वडीलांच्या शेतीमध्ये मदत करुन चांगले उत्पन्न मिळवते. मात्र केवळ वडीलांच्या शेतीमध्ये काम केले म्हणजे ते तिचे स्वतंत्र उत्पन्न झाले असे कायद्यानुसार म्हणता येणार नाही. अर्जदार क्र. १ चे स्वतंत्र उत्पन्न असल्याचे दाखवणारे कोणतेही कागदपत्र सा.वाल्यांनी दाखल केले नाही. सन २०२४ पासून अर्जदार क्र. २ व ३ या लहान मुली देखील अर्जदार क्र. १ सोबतच तिच्या माहेरी राहत आहेत व सा.वाला क्र. १ ने सन २०२४ पासून आजतागायत त्यांच्या पालन पोषणासाठी व दैनंदिन गरजांच्या पुर्ततेसाठी कोणतीही आर्थिक मदत केली नसल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून येते. तसेच अर्जदार क्र. १ ने अभिपटलावर दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यांवरुन देखील हे

सकृतदर्शनी दिसून येते की सा.वाला क्र. १ कडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असूनही त्याने अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या पालन पोषणासाठी व दैनंदिन गरजांच्या पुर्ततेसाठी कोणतीही तजवीज केली नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ सा.वाला क्र. १ कडून अतंरिम अन्न वस्त्राची रक्कम मिळवण्यास कायदेशीर रितीने पात्र ठरते. सबब, मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवते.

२८. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांना दरमहा सा.वाला क्र. १ कडून प्रत्येकी १०,०००/- इतकी अंतरिम अन्न वस्त्र रक्कम मिळण्याची मागणी केलेली आहे. मात्र सा.वाला क्र. १ च्या कथनानुसार त्याच्यावर या अर्जदारासोबतच त्याच्या माता-पित्यांची देखील जबाबदारी असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या दैनंदिन गरजांच्या पुर्ततेसाठी सा.वाला क्र. १ ने दरमहा प्रत्येकी २०००/- रुपये अर्जदार क्र. १ ते ३ यांना अंतरिम अन्न वस्त्राची रक्कम देणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. सबब, या सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अंतरिम अन्न वस्त्राचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सा.वाला क्र. १ ने अंतरिम अन्न वस्त्रापोटी अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.२०००/- अर्ज दाखल तारखेपासून ते सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावेत असे सा.वाला क्र. १ ला निर्देश देण्यात येत आहेत.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

४. सा.वाला क्र. १ ने सदर अंतरिम पोटगीची रक्कम दर महिन्याच्या १० तारखेच्या आत भरावी.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.21 11:09:19 +0530

(श्रीमती वृषाली दी. सुंगारे)

सह दिवाणी न्यायदंडाधिकारी, चांदवड,

जि.नाशिक

ठिकाण–चांदवड

दिनांक–१६.०७.२०२४